| | महाराष्ट्र शासन<br>(विधी व न्याय विभाग)<br>धर्मादाय सह आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>नांदेड विभाग, नांदेड | Govt. of Maharashtra<br>(Law and Judiciary Deptt.)<br>Joint Charity Commissioner,<br>Nanded and<br>Public Trusts Registration<br>Office, Nanded | |
|---|---|---|---|
| जिजामाता धर्मशाळा पब्लीक ट्रस्ट,<br>चौधरी पेट्रोल पंपाजवळ,<br>रेल्वे स्टेशन समोर, नांदेड - ०२<br>दुरध्वनी/फॅक्स ०२४६२-२४९७७० | | Jijamata Dharmashala Public Trust,<br>Near Choudhari Petrol Pump,<br>Opp. Railway Station, Nanded -02<br>Tel./Fax No. 02462-249770 | |
| E-mail-— supdtest.nd-mh@mah.gov.in | | Web Site- www.mahacharity.gov.in | |

जा.क्र. आस्था शाखा/ 532 /२०२६ दिनांक २.३.२०२६

# निविदा सुचना

सदरील सुचनेद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड कार्यालयासाठी एक झेरॉक्स मशीन भाडेतत्वावर घेण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

## अटी व शर्ती

१) निविदा धारकाकडे स्वत:च्या मालकीचे किमान दोन झेरॉक्स मशीन असणे आवश्यकआहे.

२) निविदा धारकाने झेरॉक्स मशीन चालविण्यासाठी पुर्णवेळ कर्मचारी (सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ६.१५) नेमणे आवश्यक राहील.

३) या कार्यालयाने सुचित केल्यास, निविदा धारकाने नेमलेल्या कर्मचा-यास झेरॉक्स मशीन चालविण्यासाठी कार्लायीन वेळेनंतर किंवा सुटीच्या दिवशी अतिरीक्त वेळ थांबावे लागेल.

४) निविदा धारकाने नेमलेला कर्मचारी अनुपस्थीत अथवा गैरहजर राहिल्यास बदली कर्मचारी नेमणे आवश्यक राहील. बदली कर्मचारी न नेमल्यास, दर दिवशी रु. १०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

५) झेरॉक्स मशीन साठी लागणारा कागद, शाई व इतर कन्झ्युमेबलस् निविदा धारकाने पुरविणे आवश्यक आहे.

६) निविदा धारकास झेरॉक्स मशीनसाठी स्वतंत्र मिटरनुसार विज बील भरावे लागेल.

७) झेरॉक्स मशीन नादुरुस्त झाल्यास, निविदा धारकाने झेरॉक्स मशीन चोवीस तासांचे आत दुरुस्त करुन द्यावे लागेल. तसे न केल्यास, दर दिवशी रु.१०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

८) निविदा धारकास निविदा मंजुर झाल्यावर रु.२००००/- ची बँक गॅरेंटी द्यावी लागेल.

९) निविदा धारकाची निविदा मंजुर झाल्यास, निविदा धारकास या कार्यालयासोबत रु.५००/- च्या बाँड पेपरवर करार करावा लागेल.

(कृपया मागे पहा)

१०) सदरील निविदा प्रक्रीया शासन मान्यतेच्या अधीन राहील.

११) निविदा अर्ज पांढ-या कागदावर टंकलिखीत करुन वरील अटी व शर्ती विचारात घेवुन झेरॉक्स मशीन भाडेतत्वावर देण्यासाठी दर नमुद करुन सदरील निविदा प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा दिवसात वरील पत्यावर कार्यालयीन वेळेत बंद लिफ्याफ्यात मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड यांचेकडे सादर करावी. बंद लिफाफ्यावर 'झेरॉक्स साठी निविदा' असे नमुद करणे आवश्यक आहे.

१२) कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना असतील.

१३) कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना असतील.

१४) सदरील निविदा सुचना https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

2/3/2026

(श्रीमती हिरा का. शेळके)
धर्मादाय सह आयुक्त
नांदेड विभाग, नांदेड.

दिनांक :- २.३.२०२६
स्थळ :- नांदेड

प्रत –
१. कार्यालयीन नोटीस बोर्ड
२. https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळासाठी.